**अतित्वर्य/महत्वाचे** पुणे महानगरपालिका
**आजचे आज वाटणे** *** स्थायी समिती ***
तहकुब सभा परिपत्र

स्थायी समितीची तहकूब झालेली सभा (**मंगळवार दि. २७/८/२०१९** रोजी तहकूब केलेली सभा) **बुधवार, दि. २८/८/२०१९ रोजी सकाळी ११:३० ( साडे अकरा ) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत **कार्यपत्रिका क्र. २२ दि. २७/८/२०१९ वरील विषय क्र.७८८ ते ८२९ चा तसेच खालील दाखल विषय क्र. ८३० त्वर्य ते ८७१ त्वर्यचा** विचार होईल.

**विषय क्र.८३० त्वर्य**

गणेश पेठ फिश मार्केट येथे विविध विकास कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२७१ दि.२२/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३१ त्वर्य**

उप आयुक्त क्र.१ अंतर्गत येरवडा-संगमवाडी क्षेत्रिय कार्यालयामधील उद्यानांमध्ये स्थापत्य, हॉर्टिकल्चर, विद्युत विषयक दुरूस्तीचे कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/२७२ दि.२२/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३२ त्वर्य**

उप आयुक्त क्र.१ अंतर्गत नगररोड क्षेत्रिय कार्यालयामधील उद्यानांमध्ये स्थापत्य, हॉर्टिकल्चर, विद्युत विषयक दुरूस्तीचे कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/२७३ दि.२२/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३३ त्वर्य**

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये डीबीटी योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या काही साहित्यासाठी कमी पडणारी र.रुपये ३,३८,१३,६९२/- वर्गीकरणाव्दारे उपलब्ध करुन देणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/शिवि(प्रा)/२७४ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३४ त्वर्य**

गोल्फ क्लब चौक येरवडा येथे उड्डाणपूल बांधणे (सी-फॉर्म पध्दतीने) कामी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/२७६ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३५ त्वर्य**

प्रभाग क्र. ४१(जुना प्रभाग क्र. ६२) कोंढवा बु. येथे शाळा इमारत बांधणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२७७ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३६ त्वर्य**

प्रभाग क्र. २५ (जुना प्रभाग क्र. ६१) वानवडी स.नं. ७७ येथील अस्तित्वातील महादजी शिंदे शाळा येथील जुनी इमारत पाडून नविन ई-लर्निंग शाळेचे उर्वरित काम पूर्ण करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२७८ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३७ त्वर्य**

सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत येणा-या मुख्य मलवाहिन्यांची देखभाल व दुरूस्तीची कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/२८० दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३८ त्वर्य**

प्रभाग क्र. २० मध्ये पथ विषयक दैनंदिन देखभाल विषयक कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२८१ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८३९ त्वर्य**

आंबेगाव खु. व आंबेगाव बु. परिसरामध्ये अस्तिवातील मलवाहिन्यांची देखभाल दुरूस्ती व तद्नुषंगिक कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/२८२ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४० त्वर्य**

पथ विभागाकडील वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील दैनंदिन देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी मोबाईल मेन्टेनन्स युटिलिटी गाडी ड्रायव्हरसह पुरविणे व दैनंदिन देखभाल दुरूस्ती विषयक कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२८३ दि. २३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४१ त्वर्य**

प्रभाग क्र. ४१ अ मधील माऊली नगर, साईनगर, गोकुळनगर, कात्रज परिसरातील रस्ते विकसीत करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२८४ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४२ त्वर्य**

वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत येणा-या मुख्य मलवाहिन्यांची देखभाल दुरूस्ती करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/२८५ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४३ त्वर्य**

ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणी रिईनस्टेटमेंटची कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२८६ दि. २३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४४ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट धायरी मधील रायकरमळा येथील गणेश मेडिकल ते महालाईनगर व स्पर्श सोसायटी ते खंडोबा मंदिर आणि परिसरामध्ये नव्याने जलवाहिनी विकसित करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/२८७ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४५ त्वर्य**

प्रभाग क्र. १४ क पुणे मनपा शाळा क्र. १४ लालबहादुर शास्त्री शाळेच्या आवारातील एव्हिएशन गॅलरीसाठी आवश्यक ती कामे करणे कामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२८८ दि.२३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४६ त्वर्य**

पुणे मनपाचे विविध कार्यालयासाठी, मनपा शाळांसाठी तसेच वॉर्डस्तरीय मागणीनुसार Multifunction Machine, Desktop Computers, Line Interactive UPS with AVR यांचे खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/२९३,दि. २६.०८.२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४७ त्वर्य**

वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्र.क्र. १३,३१,३२ व उत्तमनगर शिवणे मध्ये विविध ठिकाणी पडीक हद्दींची ठेकेदारी पद्धतीने स्वच्छता करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/परि.३/२९४, दि. २६/०८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४८ त्वर्य**

प्रभाग क्र. २८ अ मध्ये डायस प्लॉट ते पंकज हॉटेल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे फुटपाथ विकसित करणे व पावसाळी लाईन टाकणे कामी मान्यता मिळणेबाबत मा. अति. महापालिका आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२९५, दि. २६/०८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८४९ त्वर्य**

वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्र. २४ आणि २५ मध्ये विविध रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पेंट तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२९६, दि. २६/०८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८५० त्वर्य**

प्रभाग क्र. १५ क टिळकरोड मिलिंग करून डांबरीकरण करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/ पथ/२९७, जा.क्र. २६.०८.२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८५१ त्वर्य**

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. ५ अंतर्गत येणा-या विविध विसर्जन घाटांवर व हौदांवर गणेशोत्सव काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी तात्पुरती प्रकाश व्यवस्था करणे तद्नुषंगिक कामे करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/२९८,दि. २७/०८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.८५२ त्वर्य**

मा.सौ.कालिंदा पुंडे यांचे दि. १९/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. २५ ब मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.४५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८५३ त्वर्य**

मा.अमोल बालवडकर यांचे दि. २२/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ०९ क बाणेर-बालेवाडी परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू.२५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८५४ त्वर्य**

मा.राजेश येनपुरे व मा.हेमंत रासने यांचे दि. २३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १५ ड मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८५५ त्वर्य**

मा.सौ.मंजुश्री खर्डेकर यांचे दि. २३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १३ क मधील स.नं. १७ करिश्मा सोसायटी जवळ योगकेंद्र व मुलांसाठी वाचनालय उभारणेसाठी र.रू.१२ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८५६ त्वर्य**

मा.सौ.आरती कोंढरे व मा.सौ.मनिषा लडकत यांचे दि. २६/८/२०१९ चे पत्र.

ज्योती पानसे ह्या पुणे शहरात ‘ज्योती पानसे असोसिएट्स’ या नावाने गेली २० वर्षे आर्किटेक म्हणून काम करित आहेत. त्यांनी पुणे शहरात व परिसरात अनेक खाजगी संस्था व सामाजिक संस्थासाठी तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका व ‘स्मार्ट सिटी मिशन’ अंतर्गत पुणे मनपासाठी काम केलेले आहे.

‘ज्योती पानसे असोसिएट्स’ यांच्या कामाच्या अनुभवाचा पुणे महानगरपालिकेने विचार करून त्यांना पुणे मनपाच्या आर्किटेक पॅनेलवर समाविष्ट करून घेण्यात यावे. जेणे करून त्यांच्या कामाच्या अनुभवाचा पुणे मनपाला फायदा होईल.

**विषय क्र.८५७ त्वर्य**

मा.सौ.मनिषा कदम यांचे दि. २६/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ क जेटिंग मशीन व चॅम्पियन मशीनच्या सहाय्याने साफसफाई करणेसाठी र.रू.१० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८५८ त्वर्य**

मा.धनराज घोगरे यांचे दि. २६/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. २५ अ मध्ये जेटिंग मशीनच्या सहाय्याने विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन साफ करणेसाठी र.रू.१० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८५९ त्वर्य**

मा.सौ.अल्पना वरपे यांचे दि. २६/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १० क मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८६० त्वर्य**

मा.महेश वाबळे यांचे दि. २७/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ३५ ड मध्ये तळजाई वसाहत, वाळवेकर नगर, संतनगर, रावत ब्रदर्स चौक ते ट्रेझर पार्क, अध्यापक कॉलनी व इतर विविध ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेसाठी र.रू.४० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८६१ त्वर्य**

मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २७/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १ क धानोरी लोहगाव येथे पाण्याचे टँकर पुरविणेसाठी र.रू.१० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८६२ त्वर्य**

मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २७/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १ क धानोरी लोहगाव येथे पाण्याचे टँकर पुरविणेसाठी र.रू.१० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८६३ त्वर्य**

मा.सौ.उज्जवला जंगले यांचे दि. २७/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ क मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२ कोटीचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८६४ त्वर्य**

सेवा आरोग्य फाउंडेशन, नवभारत को–ऑप हौ.सोसायटी,६८५ बुधवार पेठ, पुणे ४११००२ व पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग यांना संयुक्तपणे समाज उपयोगी विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रभाग क्र.३१ मधील स.नं.१९, हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर येथील समाज मंदिराचा हॉल विनामूल्य स्वरूपात देण्याबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.राजाभाऊ बराटे व मा.सुशिल शिवराम मेंगडे यांचे दि.१२.७.२०१९ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.१५७ दि.२३/८/२०१९ विचारासाठी.

**विषय क्र.८६५ त्वर्य**

प्रभाग क्र.३६ बिबवेवाडी येथील क्रीडा संकुल हे अनेक दिवस बंद असून त्याचा वापर मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना होण्यासाठी अमलिनी फाउंडेशन, पुणे यांना संयुक्त प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थ्यांना सुट्टया सोडून सकाळी ११ ते सायंकाळी ५ यावेळेत मोफत प्रशिक्षण देऊन देण्यास व इतर वेळेस अमलिनी फाउंडेशन यांना ५ वर्षे मोफत संयुक्त वापरण्यास व करारनामा करण्याबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.हेमंत रासणे यांचे दि.१२.७.२०१९ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.१५८ दि.२३/८/२०१९ विचारासाठी.

**विषय क्र.८६६ त्वर्य**

स्वयं प्रेरणा विकास संस्था या संस्थेला महिला उद्योगासाठी वाकडेवाडी येथील महानगरपालिकेची १० बाय १० आकाराची बंद पडलेली जागा नाममात्र भाडयाने ११ महिन्याचे करारावर देण्याबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.हिमाली कांबळे व मा.सोनाली लांडगे यांचे दि.२०/८/२०१९ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.१५९ दि.२३/८/२०१९ विचारासाठी.

**विषय क्र.८६७ त्वर्य**

मा.सचिन दोडके व मा.महेंद्र पठारे यांचे दि. २७/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ३२ ड येथे विद्युत विषयक विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र.८६८ त्वर्य**

मा.हेमंत रासने, मा.दिपक पोटे व मा.विशाल धनवडे यांचे दि. २७/८/२०१९ चे पत्र.

पुणे शहरात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजर केला जात असून, हा उत्सव पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक पुणे शहरात येत असतात.त्यांच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात येतात. या स्वागत कमानीसाठी पुणे मनपामार्फत शुल्क आकारण्यात येत आहे. त्याच बरोबर रनिंग मंडपासाठीही शुल्क आकारण्यात येत आहे.

पुणे शहरातील गणेशोत्सव हा नागरिकांचा उत्सव असून नागरिक स्वयंस्पूर्तीने समर्पित भावनेने साजरा करतात. यात कोणताही स्वार्थ नसतो.

तरी गणेशोत्सवाच्या काळातील स्वागत कमानी व रनिंग मंडपासाठी आकारण्यात येणारे शुल्क संपूर्णपणे मनपाने माफ करावे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.८६९ त्वर्य**

मा.हेमंत रासने व मा.दिपक पोटे यांचे दि. २७/८/२०१९ चे पत्र.

पुणे महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी तसेच माध्यमिक व तांत्रिक विभागाकडील शिक्षकेतर सेवकांना पुणे महानगरपालिकेने मान्य केलेल्या सहाव्या वेतन आयोगातील ग्रेड पे नुसारच सातवा वेतन आयोग लागू करण्यात यावा.

**विषय क्र.८७० त्वर्य**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा पुणे महानगरपालिका तर्फे पारितोषिक व सन्मानचिन्ह देवून सत्कार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त(वि) यांचे जा. क्र.म.आ/क्रिडा/२६३ दि.२१/८/२०१९ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र.१९ दि.२६/८/२०१९ विचारासाठी.

**विषय क्र.८७१ त्वर्य**

सुधारित क्रीडा धोरणानुसार २९ ऑगस्ट क्रीडादिन, क्रीडा अभियान,क्रीडा महोत्सव व क्रीडा सप्ताह आयोजना प्रित्यर्थ होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त(वि) यांचे जा. क्र.म.आ/क्रिडा/२७० दि.२१/८/२०१९ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र.२० दि.२६/८/२०१९ विचारासाठी.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**